यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,
नासिक 422005

दि.08 /07/2020

मा.केंद्रप्रमुख आणि केंद्र संयोजक
कृषी शिक्षण केंद्र
(सर्व कृषी शिक्षण केंद्र)

महोदय

आज दिनांक 30 जून 2020 रोजी विद्यापीठांमध्ये मा. कुलगुरू, मा. कुलसचिव आणि तसेच इतर वरिष्ठांसोबत झालेल्या चर्चेनुसार आपल्याला खालील प्रमाणे अवगत करण्यात येत आहे

1) अद्यापर्यंत शासनाकडून कोणत्याही स्वरूपाच्या सूचना न मिळाल्याने विद्यापीठातील वरिष्ठ स्तरावरील प्रशासनामार्फत अद्यापर्यंत कृषी शिक्षणक्रम प्रवेशाच्या तारखे संबंधी कोणताही धोरणात्मक निर्णय अद्याप पर्यंत घेता आलेला नाही.
2)) लवकरच शासनस्तरावरून पुढील सूचना निर्गमित केल्यानंतर विद्यापीठ स्तरावर कृषी शिक्षणक्रम प्रवेशाची तारीख ठरविण्यात येईल.
3) कृषीविज्ञान विद्याशाखा तसेच इतर सर्व विद्याशाखांचा संदर्भात विद्यापीठ स्तरावर पुढील जे काही निर्णय प्रवेश प्रक्रिये विषयी, निकाला संदर्भातील इत्यादी सर्व निर्णय घेतले जातात ते सर्व निर्णय,सूचना,विद्यापीठ संकेत स्थळावर सूचनांसह रूपात प्रस्तुत केले जातात

   तरी कृपया सर्व विद्यार्थ्यांनी आणि संबंधितांनी वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर भेट देऊन दिलेल्या सूचनांचा अवलंब करावा हीच विनंती.

4) यावर्षी मार्च एप्रिल 2020 या कालावधीत घेण्यात आलेल्या प्रकल्पाच्या संदर्भात आपणास सुचित करण्यात येते की पदवी प्रकल्प मूल्यमापन आणि तोंडी परीक्षा याचा निकाल परीक्षा विभागाच्या वतीने निकाल जाहीर केल्याच्या तारखेपासून ३०दिवसांच्यापर्यंत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रकल्प कृषी शिक्षण केंद्रावर जमा करण्याची मुदत देण्यात येत आहे.

5) सध्याच्या कोविड परिस्थिती लक्षात घेता जर काही केंद्रे तसेच त्यामध्ये नोंदणीकृत असलेले विद्यार्थी हे जर कन्टोनमेंट झोन, संपूर्ण लॉक डाऊन झोन,Corona Hot Spot Zone मध्ये असल्यास तशी परिस्थिती लक्षात घेऊन विद्यापीठ स्तरावर याबाबतचा निश्चितपणे सकारात्मक विचार करून अशा विद्यार्थ्यांसाठी आणि केंद्रांसाठी पुन्हा काही दिवसांची मुदत वाढवून मिळेल याची कृपया नोंद घ्यावी.

6) सदरील प्रकल्प तीन प्रतीत, त्याची सॉफ्ट कॉपी सीडी, प्रकल्प तपासणी तज्ञाने सूचनांसह भरून दिलेला मूल्यमापन अहवाल विद्यार्थ्यांकडून घेण्यात याव्यात.

Scanned with CamScanner

7) विद्यार्थ्यांचा प्रकल्प जमा करतेवेळी केंद्र प्रमुख / केंद्र संयोजक यांनी प्रकल्प अहवाल तपासणी तज्ञाने मूल्यमापन अहवालात सुचविल्या सूचनांचा अंतर्भाव केला आहे की नाही याची खात्री करूनच प्रकल्प करून घ्यावा.

8) वरील तीस दिवसांच्या कालावधीत जेवढ्या विद्यार्थ्यांनी प्रकल्प कृषी शिक्षण केंद्रावर जमा केले आहे अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी ई-मेल द्वारे विद्यापीठास पाठवावी.

9) विद्यार्थ्यांनी प्रकल्प जमा केल्यानंतर सदरील प्रकल्प विद्यापीठास जमा करणे किंवा कसे या बाबींच्या पुढील सूचना आपणास लवकरच विद्यापीठ स्तरावरून कळविण्यात येतील.

10) त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना अथवा केंद्र प्रतिनिधी यांना प्रकल्प विद्यापीठांमध्ये जमा करण्याबाबत सध्याच्या covid-19 परिस्थितीमुळे यदा कदाचित अजून काही परिस्थिती उद्भवल्यास अशा सर्व विद्यार्थ्यांचे प्रकल्प जमा करण्यासंबंधी आपणास लवकरच विद्यापीठाने जाहीर केलेल्या पोर्टल वरील लिंक देण्यात येईल आणि त्यावर आपले प्रकल्प जमा करून घेण्याचे विचाराधीन आहे.

11) सदरील लिंक वरील माहिती भरणे आणि प्रकल्प अपलोड करणे या बाबी विद्यार्थी स्वतः करील किंवा संबंधित केंद्रामार्फत वरील याबाबत सुविधा दिल्या जाईल.

12) आपल्या केंद्रावर, केंद्र संबंधित सर्व कार्यालयीन व्यवहार करताना कोवीड पासुन सुरक्षेबाबतच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा. त्याचप्रमाणे,स्थानिक प्रशासनाने, विद्यापिठाने, विद्यापीठाच्या विभागीय कार्यालयाने वेळोवेळी प्रस्तुत केलेल्या आरोग्यविषयक घ्यावयाच्या सुरक्षेबाबत मार्गदर्शक बाबींचा अवलंब करण्यात यावा.

धन्यवाद...!!

संचालक 10/7/2020
कृषिविज्ञान विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ , नाशिक

Y.C.M. OPEN UNIVERSITY NASHIK

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी

1) मा. कुलगुरु महोदय
2) मा. कुलसचिव महोदय
3) मा. संचालक विद्यार्थी सेवा विभाग
4) मा. परीक्षा नियंत्रक
5) प्रमुख नोंदणी कक्ष

Scanned with CamScanner